**<u>ठळक बातम्या</u>**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या नवी दिल्ली इथं न्यूझीलंडचे प्रधानमंत्री ख्रिस्तोफर लक्झन यांच्यासह रायसीना संवाद २०२५चं उद्घाटन करणार

- देशाला अमली पदार्थमुक्त करण्यासाठी तपास यंत्रणा चांगलं काम करत असून अमली पदार्थाचा धंदा करणाऱ्यांना कोणत्याही प्रकारची सहानुभूती दाखवली जाणार नाही, असा केंद्रीय गृहमंत्र्यांचा इशारा

- विधानपरिषदेच्या पोटनिवडणुकीसाठी भाजपाच्या तीन उमेदवारांची नावं जाहीर

- अंतराळ स्थानकावर अडकलेले वैज्ञानिक सुनीता विल्यम्स आणि बुच विलमोर यांना परत आणण्यासाठी गेलेलं स्पेसएक्सचं कॅप्सूल आंतरराष्ट्रीय अवकाश स्थानकावर दाखल

**आणि**

- ज्येष्ठ क्रिकेटपटूंच्या टी ट्वेंटी स्पर्धेत आज अंतिम सामना भारत आणि वेस्ट इंडीज दरम्यान रंगणार

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या नवी दिल्ली इथं न्यूझीलंडचे प्रधानमंत्री ख्रिस्तोफर लक्झन यांच्यासह रायसीना संवाद २०२५चं उद्घाटन करणार आहेत. जगासमोर असलेल्या महत्त्वाच्या भूराजकीय आणि भूआर्थिक आव्हानांकडे लक्ष वेधण्यासाठी भारत हा संवाद दरवर्षी आयोजित करतो. राजकारण, व्यवसाय, माध्यमं आणि सामाजिक क्षेत्रातले नेते या संवादात सहभागी होतात.

न्यूझीलंडचे प्रधानमंत्री ख्रिस्तोफर लक्सन आजपासून पाच दिवसांच्या भारताच्या दौऱ्यावर येणार आहेत, अशी माहिती परराष्ट्र मंत्रालयाने आपल्या

निवेदनात दिली आहे. राष्ट्रपती भवनात ते राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची भेट घेतील. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या लक्सन यांची भेट घेऊन भारत-न्यूझीलंड संबंधांच्या विविध पैलूंवर चर्चा करतील. या दौऱ्यात लक्सन मुंबईलाही भेट देणार असून विविध व्यावसायिकांशी ते संवाद साधणार आहे. लक्सन यांच्या भारतभेटीचा उद्देश दोन्ही देशांमधले संबंध मजबूत करणं हा आहे.

<><><><><>

देशाला अंमली पदार्थमुक्त करण्यासाठी तपास संस्था चांगलं काम करत असून अंमली पदार्थाचा धंदा करणाऱ्यांना कोणत्याही प्रकारची सहानुभूती दाखवली जाणार नाही, असा इशारा केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी समाज माध्यमावरच्या पोस्टद्वारे दिला आहे.

इम्फाळमधे नुकतेच ८८ कोटी रुपयांच्या मेथमफेटामाइन टॅब्लेट एनसीबीने जप्त केल्या. तसंच आंतरराष्ट्रीय अंमली पदार्थ रॅकेटशी संबंधित असणाऱ्या चौघांना अटक केली. गृहमंत्री अमित शहा यांनी या कारवाईचं कौतुक केलं आणि अंमली पदार्थविरोधात कारवाई सुरूच राहील, असं सांगितलं. देशाला अमली पदार्थमुक्त करण्याच्या प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या संकल्पाचा शहा यांनी यावेळी पुनरुच्चार केला.

<><><><><>

विधानपरिषदेच्या ५ जागांसाठी होणाऱ्या पोटनिवडणुकीकरता भाजपानं तीन उमेदवारांची नावं जाहीर केली आहेत. यात छत्रपती संभाजीनगर इथले संजय केणेकर, नागपूरमधले संदीप जोशी आणि वर्ध्यातले दादाराव केचे यांचा समावेश आहे. राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना प्रत्येकी एका जागेवर उमेदवार देणार आहे.

ही निवडणूक २७ मार्च रोजी होणार आहे आणि त्याचदिवशी संध्याकाळी ५ वाजता मतमोजणी होईल. आमश्या पाडवी, प्रवीण दटके, राजेश विटेकर, रमेश कराड आणि गोपीचंद पडळकर हे विधानसभेत निवडून आल्यानं रिक्त झालेल्या

जागांसाठी ही निवडणूक होते आहे. विधानसभा आमदारांमधून ही निवडणूक होणार आहे.

<><><><><>

जगद्गुरु संत तुकाराम महाराज यांचं सदेह वैकुंठ गमन अर्थात तुकाराम बीज सोहळा आज पुणे जिल्ह्यात श्रीक्षेत्र देहू इथं साजरा होत आहे. यंदाचा हा त्रिशतकोत्तर अमृतमहोत्सवी बीज सोहळा आहे. या सोहळ्यासाठी राज्यभरातून भाविक मोठ्या संख्येनं दाखल झाले असून प्रशासनानं चोख बंदोबस्त केला आहे. देहू मध्ये अखंड हरिनाम सप्ताह आणि इतर धार्मिक कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे.

संत तुकाराम महाराज देहू संस्थानाच्या वतीनं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना 'जगद्गुरू श्री संत तुकाराम महाराज पुरस्कार' प्रदान करण्यात आला. वारीदरम्यान वारकऱ्यांच्या सेवा- सुविधांसाठी घेतलेल्या विशेष प्रयत्नांची आणि- निर्मल वारी, हरित वारी संकल्पनेत दिलेल्या योगदानाची दखल घेऊन त्यांना हा पुरस्कार दिला आहे. तुकाराम महाराजांनी चारशे वर्षांपूर्वी मराठी भाषेत तत्त्वज्ञान सांगितलं, असं नमूद करत, तुकाराम महाराज आणि संत ज्ञानेश्वरांनी धर्माबरोबरच लोकशिक्षण आणि प्रबोधनाचं मोठं कार्य केलं, असं मनोगत शिंदे यांनी पुरस्कार स्वीकारताना व्यक्त केलं....

**होल्ड - बाईट - एकनाथ शिंदे**

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात पैठण इथंही संत एकनाथ महाराज नाथषष्ठी यात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर नाथांचा रांजण भरायला आज सुरुवात झाली आहे. येत्या गुरुवारी २० तारखेला नाथषष्ठीचा मुख्य सोहळा होणार आहे.

<><><><><>

आज देशभर राष्ट्रीय लसीकरण दिन साजरा केला जात आहे. लसीकरणाबाबत जनजागृतीसाठी  दरवर्षी १६ मार्च रोजी राष्ट्रीय लसीकरण दिन

साजरा केला जातो. १९९५ साली याच दिवशी प्रथमत: देशातून पोलिओ निर्मूलनासाठी तोंडाद्वारे लस द्यायला सुरुवात झाली होती. देशातल्या प्रत्येक बालकाचं रोगसंसर्गापासून संरक्षण करण्याच्या हेतूनं लसीकरण आवश्यक असल्याचं आरोग्य मंत्रालयानं समाज माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे. या कामी आरोग्य मंत्रालयासह राज्य सरकारं आणि आरोग्य विभागातले कर्मचारी वचनबद्ध असल्याचं या संदेशात नमूद केलं आहे. देशभर लसीकरण होण्याच्या दृष्टीनं २०२४ ला मिशन इंद्रधनुष अभियानाची सुरुवात केली असून बालमृत्यूचं प्रमाण कमी करणं आणि लसीकरण मोहिमेला गती देणं हा याचा उद्देश आहे.

निरोगी आयुष्याचे करुया रक्षण लसीकरणाने मिळेल संरक्षण, या जागृती संदेशाद्वारे राज्याच्या सार्वजनिक आरोग्य आणि कुटंबकल्याण, पाणीपुरवठा राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर यांनी समाजमाध्यमांवर माहिती सामाईक केला आहे.

<><><><><>

ब्रिटनमधल्या सेंट्रल बँकिंग, लंडननं डिजिटल ट्रान्सफॉर्मशन अवॉर्ड २०२५ साठी रिझर्व्ह बँकेची निवड केल्याबद्दल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी बँकेचं अभिनंदन केलं आहे. या निवडीतून बँकेची नाविन्यता आणि प्रशासनातील कार्यक्षमता प्रतिबिंबित होते, असं त्यांनी म्हटलं आहे. डिजिटल नवोन्मेषमुळे भारतातील वित्तीय परिसंस्था आणि अनेकांचं आयुष्य बळकट व्हायला मदत होईल, असं त्यांनी म्हटलं आहे.

<><><><><>

आंतरराष्ट्रीय अवकाश स्थानकावर अडकलेले अंतराळवीर सुनीता विल्यम्स आणि बुच विलमोर यांना परत आणण्यासाठी गेलेलं स्पेसएक्सचं कॅप्सूल आज सकाळी आंतरराष्ट्रीय अवकाश स्थानकावर पोहोचलं. यात अमेरिका, जपान आणि रशियाच्या चार अंतराळवीरांचा समावेश आहे. सुनीता विल्यम्स आणि बुच विलमोर येत्या बुधवारी पृथ्वीच्या दिशेने प्रवास सुरू करतील, अशी अपेक्षा आहे. त्यांची

जागा हे चार नवे अंतराळवीर घेतील. हे दोघे फक्त एका आठवड्यासाठी अवकाशात गेले होते, मात्र तांत्रिक बिघाडामुळे त्यांचा तिथला मुक्काम नऊ महिन्यांपर्यंत पोहोचला.

<><><><><>

मुंबई विद्यापीठाच्या पहिल्या महिला पदवीधर आणि भारतातल्या पहिल्या महिला वकील कॉर्नेलिया सोरोबजी यांच्या वकिलीच्या शताब्दी वर्षानिमित्त तसंच विविध क्षेत्रांतल्या महिलांच्या कर्तृत्वाचा गौरव करण्यासाठी काल मुंबई विद्यापीठात महिला कर्तृत्वाचा सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला होता. याशिवाय ‘ब्रेकिंग ग्लास सिलिंगः वुमन हू मेड इट’ या विषयावर राष्ट्रीय परिसंवादही आयोजित केला होता. परिसंवादाचं उद्घाटन सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीश न्यायमूर्ती बी. व्ही. नागरत्ना यांच्या हस्ते झालं. राज्याच्या पहिल्या महिला मुख्य सचिव सुजाता सौनिक या कार्यक्रमाच्या सन्माननीय अतिथी होत्या. पद्मश्री राहीबाई पोपेरे, यांच्यासह विविध क्षेत्रातल्य कर्तृत्ववान महिला यावेळी उपस्थित होत्या.

<><><><><>

मध्य प्रदेशात रायपूर इथल्या शहीद वीर नारायण सिंग आंतरराष्ट्रीय स्टेडिअमवर आंतरराष्ट्रीय मास्टर्स लीग स्पर्धेचा अंतिम सामना आज खेळला जाणार आहे. सचिन तेंडुलकरच्या नेतृत्वाखालचा भारतीय मास्टर्स संघ आणि ब्रायन लाराच्या नेतृत्वाखालचा वेस्ट इंडीज मास्टर्स संघ यांच्यात मुकाबला होणार आहे. संध्याकाळी साडे सात वाजता हा सामना सुरु होईल.

<><><><><>

नशामुक्त अभियानांतर्गत नवी मुंबईतल्या गुन्हे शाखेनं आज केलेल्या कारवाईत दिघा इथल्या एका व्यक्तीकडून ३८ लाख ७९ हजार १३५ रूपये किमंतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. कारवाईच्या वेळी मोठ्या प्रमाणात गांजा, मेफेड्रोनसारखे अंमली पदार्थ, तसंच गावठी दारू, देशी आणि विदेशी दारूचा साठा

जप्त करण्यात आला. पोलिसांनी याएका व्यक्तीला अटक करून त्याच्यावर रबाळे एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. आरोपीला न्यायालयात हजर केलं असता न्यायालयानं त्याला येत्या १८ तारखेपर्यंत पोलीस कोठडी दिली. या प्रकरणातल्या अन्य आरोपींचा  शोध सुरु  आहे.

<><><><><>

भंडारा जिल्ह्यात एसटी बस आणि दुचाकी यांच्यात झालेल्या अपघातात एका महिलेचा जागीच मृत्यू झाला. बपेराहून तिरोडाकडे जाणारी ही बस वाहणी गावातून जात असताना दुचाकी घसरल्याने कोसळलेली महिला बस खाली चिरडली गेली.

<><><><><>

सायकलिंग फेडरेशन ऑफ इंडियाचे उपाध्यक्ष आणि महाराष्ट्र सायकलिंग असोसिएशनचे अध्यक्ष प्रताप जाधव यांचं आज पुण्यात आकस्मिक निधन झालं. ते ६५ वर्षांचे होते. सायकलिंग क्षेत्रातील सर्वोच्च समजल्या जाणाऱ्या “जीवन गौरव” पुरस्काराने जाधव यांना सन्मानित करण्यात आले होते. प्रताप जाधव यांनी १९७७ ते १९८७ दरम्यान खेळाडू म्हणून आपली कारर्किद गाजवली. यात राष्ट्रीय रोड सायकलिंग अजिंक्यपद स्पर्धेत सहा वेळा महाराष्ट्राचे प्रतिनीधीत्व केले होते. दोन वेळा राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेत पदक विजेती कामगिरी केली होती. १९९३ पासून राज्य तसेच राष्ट्रीय सायकलिंग संघटनेत विविध पदावर काम केले.

<><><><><>

येत्या दोन दिवसात विदर्भात उष्णतेची लाट येण्याची शक्यता भारतीय हवामान विभागाने वर्तवली आहे. मुंबईत उष्णतेची लाट कायम असून आज आणि उद्या कमाल तापमान सुमारे ३६ अंश सेल्सियस इतकं राहण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. या दरम्यान किमान तापमान २३ अंश सेल्सियस राहील.

//<><><><><>//